RNI No. MAHBIL/2012/46121

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग दोन

वर्ष ३, अंक ६९] शुक्रवार, डिसेंबर १५, २०१७/अग्रहायण २४, शके १९३९ [पृष्ठे ९, किंमत : रुपये १२.००

### असाधारण क्रमांक १२२

### प्राधिकृत प्रकाशन

### नवी मुंबई महानगरपालिका

### सूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २३(१) अन्वये नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना तयार करणेबाबतचा इरादा जाहीर करणे.**

क्रमांक नमुंमपा/नरवि/ससंनर/५१७२/२०१७

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) चे कलम ११३(१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून शासनाने नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभागाची अधिसूचना क्रमांक आरपीबी. ११७१/१८१२४/I. डब्ल्यू, दिनांक २० मार्च १९७१ द्वारे, त्यात नमूद करण्यात आलेले क्षेत्र हे नवी मुंबई ह्या नवीन नगराचे क्षेत्र म्हणून घोषित केले आहे व सिडकोस नगरविकास, सार्वजनिक आरोग्य व गृहनिर्माण विभागाची अधिसूचना क्रमांक आरपीबी. १८१२४/II. डब्ल्यू, दिनांक २० मार्च १९७१ अन्वये, उक्त अधिनियमांच्या कलम ११३(३अ) नुसार नवी मुंबई या नवीन नगर क्षेत्रासाठी (उक्त नवनगरक्षेत्र) नवनगर विकास प्राधिकरण म्हणून नियुक्त केले आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, शासनाने उक्त नवनगर क्षेत्रासाठी सिडकोने सादर केलेल्या रचनाबद्ध आराखड्याच्या (Structural Plan) स्वरूपात असलेल्या प्रारूप विकास योजनेस (उक्त अंतिम विकास योजना) नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना क्रमांक आरपीबी. ११७५/६३५/यूडी-५, दिनांक १८ ऑगस्ट १९७९ सह अधिसूचना क्रमांक आरपीबी. ११७५/६३५/यूडी-५, दिनांक १८ जानेवारी १९८० अन्वये मंजुरी दिलेली आहे आणि उक्त विकास योजना दिनांक १ मार्च १९८० पासून अंमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (उक्त महानगरपालिका अधिनियम) चे कलम ३ नुसार व शासन अधिसूचना क्रमांक एनबीसी. १०९१/१४०/सीआर-१४/९१/यूडी-२०, दिनांक १७ डिसेंबर १९९१ याद्वारे, त्यामध्ये नमूद केलेल्या ४४ महसुली गावांच्या क्षेत्रासाठी नवी मुंबई महानगरपालिकेची (नवी मुंबई महानगरपालिका) स्थापना करण्यात आली असून ती दिनांक १ जानेवारी १९९२ पासून अस्तित्वात आली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या अधिकार क्षेत्रात समाविष्ट एकूण ४४ महसुली गावांपैकी २९ महसुली गावे ही उक्त अंतिम विकास योजनेत समाविष्ट आहेत ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगरविकास विभागाच्या दिनांक ८ जून २००७ च्या क्रमांक एनएमसी. ११२०००/प्र.क्र. ५४/०४/नवि-२८ अन्वये महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ३, (३)(अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातून १४ महसुली गावे दिनांक ८ जून २००७ च्या दिनांकापासून वगळलेले असून उक्त नवनगर क्षेत्राबाहेरील केवळ अडवली-भूतावली हे एकमेव महसुली गाव नवी मुंबई महानगरपालिका हद्दीत समाविष्ट केलेले आहे असे एकूण ३० महसुली गावांचा समावेश नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाचे आदेश क्रमांक एनएमसी. १६९२/११८७/सीआर-१३८/९४/यूडी-२४, दिनांक १५ डिसेंबर १९९४ व आदेश क्रमांक टीपीबी. ४३०६/२९६४/सीआर-१७६/०८/नवि-११, दिनांक २९ जुलै २००८ अन्वये शासनाने नवी मुंबई महानगरपालिकेस उक्त अधिनियमातील प्रकरण क्रमांक ३ व ४ चे अधिकार प्रदान केलेले आहेत. आणि या आदेशानुसार त्यासोबतच्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या नवी मुंबईतील वाशी, सानपाडा, नेरुळ, बेलापूर (सी.बी.डी), कोपरखैरणे, ऐरोली व घणसोली या विकसित नोडमधील २९ महसुली गावांतील क्षेत्रासाठी उक्त अधिनियमाच्या कलम २ (१५) (अ) आणि २ (१९) मधील तरतुदीनुसार नवी मुंबई महानगरपालिकेला उक्त अधिनियमाचे प्रकरण क्रमांक ३ व ४ (कलम २१ ते ५८) खालील अधिकार प्राप्त झाले आहेत ;

आणि ज्याअर्थी, उक्त अंतिम विकास योजनेत अंतर्भूत सिडको विकसित नोडबाहेरील अविकसित भागामधील महसुली गावातील क्षेत्रासाठी उक्त अधिनियमाच्या कलम २(१५) (अ) आणि २(१९) मधील तरतुदीनुसार नियोजन प्राधिकरणाचे सर्व अधिकार नवी मुंबई महानगरपालिकेस प्राप्त आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजना अंमलात आल्यापासून २० वर्षांच्या कालावधीत निदान एकदा तरी उक्त विकास योजना सुधारित करणे उक्त अधिनियमाच्या कलम ३८ अन्वये आवश्यक आहे. तसेच उक्त अंतिम विकास योजना ही रचनात्मक आराखडयाच्या स्वरूपात असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे सुक्ष्म स्तरावरील नियोजने दर्शविलेले नाही ;

आणि ज्याअर्थी, नवी मुंबई महानगरपालिकेकडे नियोजन प्राधिकरणाच्या सर्व शक्ती विहित असल्याने उक्त अंतिम विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३८ अन्वये सुधारित करण्याचे अधिकार नवी मुंबई महानगरपालिकेला आहेत ;

आणि ज्याअर्थी, नवी मुंबई महानगरपालिका हद्दीमध्ये उक्त नवनगर क्षेत्राच्या अंतिम विकास योजना क्षेत्राबाहेरील परंतु मंजूर मुंबई महानगर प्रदेशाच्या प्रादेशिक योजनेत अंतर्भूत असलेल्या १५ महसुली गावांपैकी वरील परिच्छेदात नमूद अडवली-भुतावली या एका महसुली गावाचा समावेश नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत करणेत आलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, नवी मुंबई महानगरपालिकेस उक्त अधिनियमाच्या कलम २(१५) (अ) आणि २(१९) मधील तरतुदीनुसार नियोजन प्राधिकरणाचे सर्व अधिकार प्राप्त असल्याने उक्त अधिनियमाच्या कलम २१ अन्वये अडवली-भुतावली या एका महसुली गावासाठी नव्याने विकास योजना तयार करणेचे अधिकार नवी मुंबई महानगरपालिकेला आहेत ;

आणि ज्याअर्थी, नवी मुंबई महानगरपालिका विद्यमान क्षेत्राची सुधारित विकास योजना तयार करणेकामी खाजगी संस्थेची नियुक्ती करणेबाबतच्या ठरावास सर्वसाधारण सभेने दिनांक २२ ऑगस्ट २०१३ रोजी ठराव क्रमांक ३३२ अन्वये मंजुरी दिलेली होती. त्यानंतर सदर ठरावामध्ये अंशतः बदल करून संपूर्ण वैधानिक कार्यवाही महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत करणेबाबतचा ठराव सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेत आलेला होता. परंतु सदरचा ठराव क्रमांक १२६६, दिनांक २३ सप्टेंबर २०१६ रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये नामंजूर करणेत आलेला होता. सदर ठराव पुनःश्च सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेत आला असता त्यास ठराव क्रमांक १८५० अन्वये दिनांक २४ जुलै २०१७ रोजी सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने ठराव क्रमांक १२६१ अन्वये दिनांक २१ सप्टेंबर २०१६ रोजी उक्त अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये विकास योजनेचा ईरादा जाहीर करण्यास मंजुरी प्रदान केली असुन उक्त अधिनियमान्वये विकास योजनेची संपूर्ण वैधानिक कार्यवाही करणेसाठी आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांना प्राधिकृत केलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाने दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ रोजीच्या अधिसूचनेअन्वये या सूचनेसोबतच्या अनुसूची “ब” येथे नमूद नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील काही जमिनीसाठी सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण नियुक्ती केली आहे;

आणि म्हणून आता, उक्त अधिनियमान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, नवी मुंबई महानगरपालिका हे उक्त कलम २३(१) नुसार या नोटीस सोबतच्या अनुसूची “अ” मध्ये निर्देशीत केलेल्या क्षेत्रामधून अनुसूची “ब” मध्य निर्देशित केलेले क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्राची प्रारुप विकास योजना तयार करणेबाबत उक्त अधिनियमाच्या कलम २३(१) च्या तरतुदीनुसार इरादा जाहीर करीत आहे की,

(१) या सूचनेसोबत जोडलेल्या नकाशामध्ये दर्शविलेल्या, उक्त अंतिम विकास योजनेत अंतर्भूत असलेल्या सिडको विकसित तसेच अविकसित क्षेत्रासाठी (म.औ.वि.म व सिडको हे विशेष नियोजन प्राधिकरण असलेले क्षेत्र वगळून) उक्त अधिनियमाच्या कलम ३८ मधील तरतुदीनुसार सुधारित प्रारूप विकास योजना तयार करून प्रसिद्ध करणेची आहे, आणि,—

(२) या सूचनेसोबत जोडलेल्या नकाशामध्ये दर्शविलेल्या उक्त अंतिम विकास योजनेबाहेरील परंतु मंजूर मुंबई महानगर प्रदेश प्रादेशिक योजनेत अंतर्भूत असलेल्या अडवली-भुतवली या एका महसुली गावाच्या क्षेत्रासाठी उक्त अधिनियमातील कलम २१ अन्वये प्रारूप विकास योजना तयार करून प्रसिद्ध करणेची आहे.

ज्यासाठी, सुधारित विकास योजना आणि प्रारूप विकास योजना तयार करावयाची आहे अशा अधिसूचित क्षेत्राची सीमा दर्शविणारा नकाशा अनुसूची "क" कामकाजाच्या सर्व दिवशी कार्यालयीन वेळेत जनतेच्या पाहणीसाठी खाली नमूद केलेल्या कार्यालयामध्ये पाहणीसाठी खुला ठेवला आहे. तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या *www.nmmc.gov.in* या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे.

(१) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे.

(२) सहसंचालक, नगररचना, कोंकण विभाग, कोंकण भवन, सी.बी.डी. बेलापूर.

(३) सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, पहिला मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे.

(४) सहायक संचालक, नगररचना, नवी मुंबई महानगरपालिका, मुख्यालय, दुसरा मजला, भूखंड क्रमांक ०१, किल्ले गावठाणजवळ, पामबीच जंक्शन, सेक्टर क्रमांक १५ए, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

प्रस्तावित प्रारूप विकास योजनेच्या हद्दीबाबत नागरिकांच्या सूचना आणि/किंवा हरकती असल्यास त्या सहायक संचालक, नगररचना, नगररचना विभाग, नवी मुंबई महानगरपालिका, मुख्यालय, दुसरा मजला, भूखंड क्रमांक ०१, किल्ले गावठाणजवळ, पामबीच जंक्शन, सेक्टर क्र. १५ए, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ यांचेकडे किंवा *owaismomin@nmmconline.com* या ई-मेल वर पाठविणेत याव्यात.

.......................................................... **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ६० (साठ) दिवसांच्या कालावधीत प्राप्त झालेल्या लेखी सूचना आणि/किंवा हरकती नवी मुंबई महानगरपालिका विचारात घेईल.

**टीप :** ज्या ज्या ठिकाणी महानगरपालिका क्षेत्राच्या हद्दीमधील काही क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कक्षेत येते त्यात्या क्षेत्रासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे विशेष नियोजन प्राधिकरण असेल. तसेच दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७ रोजीच्या (टिपीएस. १२१७/अनौ.सं.१/प्र.क्र.१०२/१७/नवि-१२) शासन अधिसूचनेनुसार अनुसूची "ब" मध्ये नमूद क्षेत्रासाठी सिडको हे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत असेल.

**डॉ. रामास्वामी एन.,**
आयुक्त,
नवी मुंबई महानगरपालिका.

नवी मुंबई,
दिनांक १४ डिसेंबर २०१७.

## अनुसूची - “अ”

(जा.क्र.नमुंमपा/नरवि/ससंनर/५१७२/२०१७, दिनांक १४ डिसेंबर २०१७ सूचना सोबतचे सहपत्र)

## नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महसुली गावे

| अ. क्र. | महसुली गावांची नावे |
|---|---|
| १ | ऐरोली (भागशः) |
| २ | बेलापूर (शहाबाज) |
| ३ | बोनसरी (भागशः) |
| ४ | बोरीवली (भागशः) |
| ५ | चिंचवली (भागशः) |
| ६ | दिघा (भागशः) |
| ७ | दिवा |
| ८ | दारावे |
| ९ | घणसोली (भागशः) |
| १० | गोठीवली |
| ११ | इलठण (भागशः) |
| १२ | जु |
| १३ | करावे |
| १४ | खैरणे (भागशः) |
| १५ | कोपरखैरणे (भागशः) |
| १६ | कुकशेत (भागशः) |
| १७ | महापे (भागशः) |
| १८ | नेरुळ |
| १९ | पावणे (भागशः) |
| २० | रबाळे (भागशः) |
| २१ | सानपाडा |
| २२ | सारसोळे |
| २३ | सावली (भागशः) |
| २४ | शिरवणे (भागशः) |
| २५ | सोनखार |
| २६ | तळवली (भागशः) |
| २७ | टेटवली (भागशः) |
| २८ | तुर्भे (भागशः) |
| २९ | वाशी |
| ३० | अडवली-भूतावली |

(उपरोक्त तक्त्यामध्ये भागशः दर्शविण्यात आलेल्या महसुली गावाचे काही क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कक्षेत येते त्या त्या क्षेत्रासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ हे विशेष नियोजन प्राधिकरण असेल.)

**अनुसूची - "ब"**

(जा.क्र. नमुंमपा/नरवि/ससंनर/५१७२/२०१७, दिनांक १४ डिसेंबर २०१७ सूचना सोबतचे सहपत्र)

शासन अधिसूचना टीपीएस. १२१७/अनौ. सं.१/प्र.क्र.१०२/१७/नवि-१२, दिनांक ३१ ऑक्टोबर २०१२ अन्वये सिडकोला विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक केलेल्या नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील महसुली गावांमधील जमिनीचा तपशील :—

| अ. क्र. | महसुली गावांची नावे | स.नं. |
|---|---|---|
| १ | दिघा | २६०,२३१ |
| २ | ईलठण | १००,९९ |
| ३ | टेटवली | १४६ |
| ४ | रबाळे | ११० |
| ५ | घणसोली | ५२८ |
| ६ | महापे | २०२अे |
| ७ | बोरीवली | ९४ |
| ८ | करावे | १४३, १४४, १४५, १४६, १४७, १४८, १४९, १५०, १५१, १५२, १५३, १५४, १५५, १५६, १५७, १५८, १५९, १६०, १६१, १६२, १६३, १६४, १६५, १६६, १६७, १६८, १६९, १७०, १७१, १७२, १७३, १७४, १७५, १७६, १७७, २२१, २२२, २२३, २३० (नवीन सर्व्हे नं. २९०), २५६, २६४बी, २२४, २९७. |

नवी मुंबई,
दिनांक १४ डिसेंबर २०१७.

**डॉ. रामास्वामी एन.,**
आयुक्त,
नवी मुंबई महानगरपालिका.

## NAVI MUMBAI MUNICIPAL CORPORATION

**Notice**

**Declaration of intention to prepare Development Plan of Navi Mumbai Municipal Corporation under section 23(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

No. NMMC/TPO/ADTP/5172/2017

Whereas, the Govt., in exercise of the powers conferred by section 113(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "said Act") has designated site for New Town of Navi Mumbai (hereinafter referred to as "said New Town") *vide* Urban Development and Public Health Department's (UD and PH) Notification No. RPB.1171/18124/I.W., dated the 20th March 1971 and CIDCO has been appointed as New Town Development Authority (NTDA) for the said New Town under section 113(*3A*) of the said Act *vide* Urban Development and Public Health Department's Notification No. RPB.1171/18124/II-W., dated the 20th March 1971 ;

And whereas, the Govt. in exercise of the powers conferred by section 31(*1*) of the said Act and *vide* UD and PH's Notification No. RPB.1175/635/UD-5, dated the 18th January 1980 has sanctioned the Draft Development Plan (said Final Development Plan) in the form of structural plan submitted by CIDCO for the said New Town area and the said Final Development Plan came into force with effect from 1st March 1980 ;

And whereas, Navi Mumbai Municipal Corporation (NMMC) has been constituted by the Govt. under section 3 of the Maharashtra Municipal Corporation Act, 1949 (hereinafter referred to as the "said MMC Act") *vide* UDD's Notification No. NBC.1091/140/CR-14/91/UD-20, dated the 17th December 1991 for the areas of 44 revenue villages specified therein, which came into force with effect from 1st January 1992. Out of 44 revenue villages within NMMC's limit 29 revenue villages are included in the said Final Development Plan ;

And whereas, the Govt. in exercise of the powers under section 3(*3*) (*a*) of the said MMC Act and *vide* Urban Development Department's (UDD), Notification No. NMC.112000/CR-54/04/UD, dated the 8th June 2007 has altered the limits of NMMC by excluding the areas of 14 revenue villages & retained only one revenue village outside the said New Town *i.e.* Adavali-Bhutavali in the limit of NMMC and thus total 30 revenue villages are falling within NMMC's limit ;

And whereas, powers under Chapter 3 and 4 (sections 21 to 58) of the said Act has also been vested to NMMC by the Govt. *vide* Notification No. NMC.1692/1187/C-138/94/UD-24, dated the 15th December 1994 and No. TPB.4306/2964/CR-176/08/UD-11, dated the 29th July 2008. By these notifications, the NMMC was declared as a Planning Authority as per the provisions of section 2(*15*) and 2(*19*) of the said Act. The NMMC is now functioning as a Planning Authority for the area of 29 revenue villages in respect of the developed nodes of Vashi, Sanpada, Nerul, Belapur (CBD), Koperkhairane, Airoli and Ghansoli ;

And whereas, the powers of Planning Authority has also been vested to NMMC as per the provisions of section 2(*15*) (*a*) and 2(*19*) of the said Act for the undeveloped areas of revenue villages outside the CIDCO developed Nodes but falling within the said Final Development Plan ;

And whereas, it is expedient to revise the said Final Development Plan at least once in a 20 years as per provision of section 38 of the said Act. The said Final Development Plan is in the form of structure plan and no micro level planning was shown on the said Final Development Plan ;

And whereas, the NMMC, being a Planning Authority of the area is empowered to revise the said Final Development Plan under section 38 of the said Act ;

And whereas, out of 15 revenue villages, which were outside the said Development Plan but already included in the sanctioned Mumbai Metropolitan Regional Plan (MMRP) at the time of its constitution, only one revenue village *i.e.* Adavali-Bhutavali is retained in the NMMC's limits ;

And whereas, as per the provisions of section 2(*15*) (*a*) and 2(*19*) of the said Act, NMMC is empowered as Planning Authority. Therefore, it is, expedient to prepare a fresh Draft Development Plan, for the only revenue village, Adavali-Bhutavali as per the provisions of section 21 of the said Act ;

And whereas, The General Body of NMMC in its meeting held on dated 22nd August 2013 *vide* Resolution No.332 has given approval to appoint Private Agency for the preparation of Revised Draft Development Plan for its jurisdiction. Further, a proposal with minor changes in the earlier approved Resolution for executing the statutory proceedings of Development Plan by Town Planning Department of NMMC instead of Private Agency was submitted to General Body, but the proposal was rejected by the General Body in its meeting held on, dated 23rd September 2016 by Resolution No. 1266. The above said proposal was again re-submitted and the General Body has given its approval to the proposal in its meeting held on dated the 24th July 2017 *vide* its Resolution No.1850 ;

And whereas, the General Body in its meeting held on 29th September 2016 *vide* Resolution No. 1261 has given its approval to declare intention under section 23(*1*) of the said Act to prepare Development Plan for NMMC area and has also authorized the Commissioner, NMMC for carrying out necessary statutory proceedings of Development Plan as per the provisions of the said Act ;

And whereas, Government *vide* its Notification, dated the 31st October 2017 has appointed CIDCO as a Special Planning Authority for some of the land within in NMMC's limit as shown in the Schedule 'B' appended hereto.

Now therefore, in exercise of the powers conferred by the said Act, the NMMC under section 23(*1*) of the said Act, hereby declare its intention to prepare the Draft Development Plan for the area excluding the area shown in Schedule 'B' from the area shown in Schedule 'A' appended hereto,—

(*1*) To prepare and to publish a Revised Draft Development Plan as per the provisions of section 38 of the said Act for the area shown on the plan appended hereto as Schedule 'C' and for the CIDCO developed and undeveloped areas within the said Final Development Plan (excluding the areas for which Maharashtra Industrial Development Corporation and CIDCO are functioning as the Special Planning Authority).

(*2*) To prepare and publish a draft Development Plan under the provisions of section 21 of the said Act for the NMMC's revenue village Adavali–Bhutavali which falls outside the said Final Development Plan, but is within the sanctioned Mumbai Metropolitan Regional Plan and as shown on the plan appended hereto as Schedule 'C'.

A Plan appended hereto as Schedule 'C' showing the boundaries of the area for which the Revised Draft Development Plan alongwith the area for which a fresh Draft Development Plan is to be prepared, is kept open for the inspection of the public on all working days and in working hours at the Office of the following and published on NMMC's website *www.nmmc.gov.in.*

(*a*) Collector, Collector Office, Thane.

(*b*) Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, C.B.D. Belapur.

(*c*) Assistant Director of Town Planning, Thane Branch, 1st Floor, Collector Office, Thane.

(*d*) Assistant Director of Town Planning, NMMC, Town Planning Department, Head Quarter, Plot No. 01, Near Kille Gaonthan, Palm Beach Junction, Sector No. 15A, C.B.D., Belapur, Navi Mumbai 400 614.

Any citizen, who want to submit any objection and/or suggestion about the boundaries of proposed Draft Development Plan limits, he may submit in writing to the Assistant Director of Town Planning, NMMC, Town Planning Department, Head Quarter, Plot No. 01, Near Kille Gaonthan, Palm Beach Junction, Sector No. 15A, C.B.D, Belapur, Navi Mumbai 400 614 or on email-owaismomin@nmmconline.com.

It shall be noted that, as per section 23(*1*) of the said Act, suggestions or objections, if any, received by NMMC in writing within 60 (Sixty) days from the date of publication of this Notice in the *Maharashtra Government Gazette* (MGG) would only be considered.

*Note* :— In the above referred villages wherever part of the area in these revenue villages falls in MIDC's jurisdiction, MIDC will continue to be the Special Planning Authority. Further, CIDCO will continue to be Special Planning Authority as per the Government Notification dated 31st October 2017 (TPS.1217/UOR-1/C.R.102/17/UD-12) for the land as shown in Schedule 'B' appended hereto.

*Schedule "A"*

(Accompaniment to Notice No. NMMC/TPO/ADTP/5172/2017, Date : 14/12/2017)

**Revenue Villages within NMMC's Jurisdiction**

| Sr. No. | Name of Revenue Village |
|---|---|
| 1 | Airoli (Part) |
| 2 | Belapur (Shahabaj) |
| 3 | Bonsari (Part) |
| 4 | Borivali (Part) |
| 5 | Chinchavali (Part) |
| 6 | Digha (Part) |
| 7 | Diva |
| 8 | Darave |
| 9 | Ghansoli (Part) |
| 10 | Gothivali |
| 11 | Ilthan (Part) |
| 12 | Ju |
| 13 | Karave |
| 14 | Khairane (Part) |
| 15 | Kopar-Khairane (Part) |
| 16 | Kukshet (Part) |
| 17 | Mahape (Part) |
| 18 | Nerul |
| 19 | Pawane (Part) |
| 20 | Rabale (Part) |
| 21 | Sanpada |
| 22 | Sarsole |
| 23 | Savali (Part) |
| 24 | Shirawane (Part) |
| 25 | Sonkhar |
| 26 | Talavali (Part) |
| 27 | Tetavali (Part) |
| 28 | Turbhe (Part) |
| 29 | Vashi |
| 30 | Adavali-Bhutavali |

In above referred revenue villages, wherever part area of these villages falls in MIDC's Jurisdiction, MIDC will be the Special Planning Authority for such area.

*Schedule "B"*

(Accompaniment to Notice No. NMMC/TPO/ADTP/5172/2017, Date : 14/12/2017)

**List of lands for which CIDCO has been appointed as Special Planning Authority *vide* Government Notification No. TPS/1217/VOR-1/C.R. 102/17/UD-12, dated 31st October 2017.**

| Sr. No. | Name of Revenue Villages | Survey Nos. |
|---|---|---|
| 1 | Digha | 260, 231 |
| 2 | Ilthan | 100, 99 |
| 3 | Tetavali | 146 |
| 4 | Rabale | 110 |
| 5 | Ghansoli | 528 |
| 6 | Mahape | 220A |
| 7 | Borivali | 94 |
| 8 | Karave | 143, 144, 145, 146, 147, 148, 149, 150, 151, 152, 153, 154, 155, 156, 157, 158, 159, 160, 161, 162, 163, 164, 165, 166, 167, 168, 169, 170, 171, 172, 173, 174, 175, 176, 177, 221, 222, 223, 230 (New Survey No. 290), 256, 264B, 224, 297. |

DR. RAMASWAMI N.,
Commissioner,
Navi Mumbai Municipal Corporation.

Navi Mumbai,
Dated 14th December 2017.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.